न ही ज्ञानेन सदृश पवित्रमिह विधते

छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ वडूजचे

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

## मराठी विभाग

## विषय : काव्याशास्त्र

| विदयार्थिनींची नावे | रोल नं. |
|---|---|
| १) ननावरे स्वाती नागेश | ४२६ |
| २) ननावरे दिपाली नागेश | ४२५ |
| ३) कोळेकर पूजा नानासो | ४२३ |

पर्यवेक्षक : प्रा. डॉ. सौ. केंजळे सविता
अधिव्याख्याती

कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज.

(शैक्षणिक वर्ष [illegible])
2019-20

ARTS & COMMERCE COLLEGE
Tal.Khatav
Dist.Satara
VADUJ

प्रमुख
वडूज, सातारा

# नाळ

Scanned with CamScanner

# नाळ चित्रपट

| | | |
|---|---|---|
| **निर्मिती** | : | **नागराज मंजुळे, सुधाकर रेड्डी यंकट्टी** |
| | | वैशाली विराज लोंढे, निखिल वरडकर |
| | | नितीन प्रकाश वैदय, प्रशांत मधुसुदन पेठे |
| **कथा** | : | सुधाकर रेड्डी यंकट्टी |
| **पटकथा** | : | सुधाकर रेड्डी यंकट्टी |
| **प्रमुख कलाकार** | : | श्रीनिवास पोकळे |
| | | नागराज मंजुळे |
| | | देविका दफ्तरदार |
| **संगीत** | : | अव्दैत नेमलेकर |
| | | ए. व्हि. प्रुफल्लचंद्र |
| | | (अतिथी संगीतकार) |
| **वितरक** | : | आटपाट चित्रपट |
| | | मृदगांडा चित्रपट |
| **भाषा** | : | मराठी चित्रपट |
| **निर्मितीखर्च** | : | ३ कोटी |
| **अवधी** | : | १ तास ५७ मिनिटे |
| | | १६ नोव्हेंबर २०१८ |
| **परुस्कार** | : | राष्ट्रीय चित्रपट सर्वोकृष्ट |
| | | बाल कलाकार पुरस्कार |

Scanned with CamScanner

## नागराज मंजुळेकर

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | नागराज पोपटराव मंजुळे |
| **जन्मतारीख** | : | २३ मार्च १९७६ |
| **जन्मस्थळ** | : | जवाहरलाल नेहरु वास्तूकला ललितकला विश्वविद्यालय |
| **पुरस्कार** | : | इंदिरा गांधी सर्वोत्कृष्ट पदार्पण चित्रपट दिग्दर्शक |
| **पिस्तूल्या** | : | लघुपट |
| **फॅन्ड्री** | : | मराठी चित्रपट |
| **सैराट** | : | मराठी चित्रपट या चित्रपटाची ६६ व्या बर्लिन आंतरराष्ट्रीय चित्रपट मेळयासाठी निवड झाली |
| **पुरस्कार** | : | १. त्यांच्या उन्हाच्या कटाविरुध्द या कविता संग्रहाला दमाणी साहित्य पुरस्कार मिळाला<br>२. पुण्याच्या मुक्तांगण परिवारातर्फे देण्यात येणारा डॉ अनिल अवचट संघर्ष पुरस्कार<br>३. साहित्यीक कलावंत प्रतिष्टानचा वाग्यज्ञ पुरस्कार |

Scanned with CamScanner

## व्यक्तीगत जीवन

सोलापूर जिल्हयातील करमाळा तालुक्यातील जेऊर गावचे नागराज हे आहेत. त्यांचा जन्म वडार समाजात झाला आहे या समाजात शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी तरीही नागराज यांचे पदवीपर्यंत शिक्षण जेऊर येथे झाले. पुढील शिक्षणासाठी ते पुणे विद्यापीठात मराठी विषयात एम. ए. केले पुढे एम. फिल केले नगरच्या महाविद्यालयात मास कम्युनिकेशनचा दोन वर्षांचा कोर्स पुर्ण केला आणि तिथेच प्रोजेक्टचा एक भाग म्हणून “पिस्तुल्या” ही पहिल्या लघुपट निर्माण केला.

Scanned with CamScanner

## प्रस्तावना

नाळ हा २०१८ मध्ये प्रदर्शित मराठी चित्रपट असुन तो सुधाकर रेड्डी यंकट्टी यांनी लिहलेला अणि दिग्दर्शित असुन नागराज मंजुळे निर्मित आहे. हा चित्रपट १६ नोव्हेंबर २०१८ रोजी प्रदर्शित झाला टाईम्स ऑफ इंडिया पुनरावलोकनात म्हटले आहे की "नाळ" ही एक सुंदर उत्कृष्ट चित्रपट आहे.

नाळ ही कथा काही प्रमाणात नागराज मंजुळेकरांच्या आयुष्याशी मिळती जुळती आहे कारण "नाळ" मधील चैत्याप्रमाणेच मंजुळेकरांनाही दत्तक घेतले होते. नागराज मंजुळेकर म्हणतात की "नाळ" या चित्रपटाची कथा काही प्रमाणत माझ्या आयुष्याशी मिळती असुन एकमेकांशी साधर्म्य राखत असलीतरी त्या दोन्ही गोष्टी वेगवेगळया आहे. नाळची गोष्ट ही माझी गोष्ट नाही नाळच्या दिग्दर्शक सुधाकर रेड्डी यंकट्टी जेव्हा मला ही गोष्ट संगितली तेव्हा मी त्याल म्हणालो की, ही गोष्ट मी लिहायला हवी होती. परंतू मी माझी गोष्ट लिहीली असली तरी ती खूप वेगळी आहे. मंजुळेकरांना त्याच्या वडिलांनी दत्तक दिले हे त्यांना उशिरा समजले "नाळ" मधील चैत्याप्रमाणे अचानक समजल नाही. त्यामुळे नागराज यांना त्याचा धक्का बसला नाही नागराजने त्यांच्या कोण होईल मराठी करोडपती? या रियालिटी शोमधील त्याच्या नव्या स्टाईल विषयीसुध्दा माहिती दिली. नागराज म्हणाले की "मी या शोमध्ये स्मार्ट दिसतोय" आयुष्यात पहिल्यादा मी मोठया पार्लरमध्ये जाऊन केस कापले. मी आमचा स्टायलिस्ट आणि डिझायनरने जे काही सांगितलं आहे ते फॉलो करतोय. मी या शोमुळे पहिल्यांदा चांगल दिसन आणि राहण्याचा प्रयत्न करतोय. परंतू या शोमध्ये आपलं वाचन कमी झाल्याची खंतदेखील त्योन व्यक्त केली.

नागराजच्या सरळ थेट चित्रणशैलीला प्रभाव असला तरी जाणवल्याशिवाय राहत नाही ओघात का होईना गावातली सदयः परिस्थिती वाहतुकीची समस्या बैलगाडीत प्रवास अशा अनेक वास्तवांकडे दिग्दर्शक जाता जाता लक्ष वेधतो. अव्दैत नेमळेकरचे पार्श्वसंगीत चित्रपटाला प्रवाही ठेवते. मात्र पुर्वार्धात अनेक ठिकाणी

Scanned with CamScanner

चित्रपटाची कथा काहीशी रेंगाळताना दिसते उत्तरार्धात त्या तुलनेत गोष्टी वेगाने घडतात.

रेंगाळलेपण कमी झाले असते तर त्याचा प्रभव आणखी वाढला असता. मात्र नाळची कथा, दिग्दर्शन, अभिनय या सगळयातला साधंपणा आणि सच्चेपणा यातुनचा हा एक सुंदर चित्रनुभव ठरला आहे हिंदी चित्रपटाच्या निमित्ताने नागराज ए.बी.पी. माझाच्या माझा कट्टा या कार्यक्रमात सहभागी झाला होता. यावेळी नागराजने त्यांच्या आयुष्याचे काही पैलू उलगडले.

"नाळ" ने पहिल्या आठवडयातच तब्बल १४ कोटी रुपयांची कमाई केली १६ नोव्हेबरला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आहे.

Scanned with CamScanner

# नाळ : माय - लेकाची भावस्पर्शी कथा

भगवान श्री कृष्णाची देवकी ही जन्मदात्री होती. मात्र लहाणपणापासूनच त्याचा सांभाळ मोठया ममतेने यशोदेनं केला ही महाभारत कथा सर्वांनाच माहित आहे वास्तव जीवनातही अशा अनेक "यशोदा" असतात. त्यंनी जन्म दिलेला नसतातनाही त्यांनी ज्यांना लहानपणापासून ममतेनं सांभाळलेलं असतं अशा मुलानबरोबर त्यांची "नाळ" इतकी घट्ट जोउलेली असतेकी कोणीही त्यांचं हे नात हिरावून घेवू शकत नाही "नाळ" या नवीन चित्रपटात अशाच एका माय-लेकाची भवास्पर्शी कथ आहे चित्रपटाच्या कथेला ग्रामीण पार्श्वभूमी आहे.

शिवाय एक निर्माता संवादलेखक आणि प्रमुख भूमिका या नात्यांन कथेला नागराज मंजुळे यांचा खास टच आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच चित्रपटाकडे वेगळया दृष्टीनं पहिल जातं नागराज मंजुळे त्यांच्या "सैराट"चं छायाचित्रण करणारे व दिग्दर्शन केलं आहे त्यामुळे चित्रपटाच्या सर्व अंगानी विचार केल तर प्रेक्षकांशी घट्ट नाळ जोडण्यात हा चित्रपट चांगलाच यशस्वी झाला आहे. नदीचं विस्तीर्ण पात्र जवळच असणाऱ्या एका गावात राहणाऱ्या चैत्या (श्रीनिवास पोकळे) या लहान मुलाची ही कथा आहे. कथेचा केंद्रबिंदु तोच असल्यामुळे अर्थातच संपूर्ण कथा त्याच्या भोवती फिरते. आपली आई व सावकार असलेले वडिल आजी सोबत राहणारा हा आवखळ आणि अल्लड आहे इंग्रजी माध्यमातील स्कूलमध्ये "टमटम" मधून जाणारा चैत्या शाळे व्यतिरिक्त सर्व खेळ नदीच्या पात्रात हुंदडण्यात आणि मित्रासोबत खेळवण्यात घालवतो. खेळण्याबाबत आजी त्याला नेहमीच पाठीशी

Scanned with CamScanner

घालत असल्यानं अभ्यास करण्याचा लकडा लावणात्या आईला तो प्रेमानं का होईना तसा त्रासच देत असतो.

इतर वेळी मात्र ग्रहीणी असलेली त्यीच आई त्याच्यावर विलक्षण प्रेम करत असते. मात्र एकदा त्याच्या घरी आलेल्या त्याचा मामा चैत्याला एक असं काही "सिक्रेट" सांगतो की त्यामुळे चैत्याच्या आयुष्यात एक वादळ येतं चैत्याला आपली आई एकदम परकी वाटायला लागते. त्या दिवसापासून त्यांच आयुष्य बदलून जातं तो वेगळयाच संशयाने आईकडे पाहू लागतो. तिच्याशी तुटक पणे वागू लागतो सुरुवातीला आईला हे जाणवत नाही मात्र नंतर हळुहळू त्याच्या या विचित्र वागण्याच कारण कळू लागत.

एके दिवशी म्हाताऱ्या आजीला आपल्या भावाकडे पाठवण्याच सावकार ठरवतात. त्यावेळी चैत्याही आजीसोबत जाण्याचा हट्ट करतो. त्यांच खरं कारण ही मामान सांगितलेलं "सिक्रेट" असत. आणि आजीमुळे त्याचा हा हट्ट पूर्ण होतो परंतू बैलगाडीन काकाच्या गावाला जात असताना मध्येच एक विपरीत घटना घडते त्यामुळे त्या सर्वाना काकाच्या गावी न जाता पून्हा आपल्या घरी परत यांव लागत ती घटना कोणती ? आणि मामानं असं कोणत "सिक्रेट" सांगितलेलं असतं की ज्याच्यामुळे चैत्या आपल्या आईशी तुटकपणे वागू लागतो. आणि त्याला काकाच्या गावाकडे जाण्याची ओढ का लागलेली असते हे सर्व पडदयावर पाहणं उचित.

कथेला पूर्णपणे ग्रामीण वातावरणाची पार्श्वभूमी आहे. चित्रीकरणासाठी परिसरच असा निवडला आहे की या निसर्गाच्या साक्षीने प्रेषक कथे्तमध्ये चांगलाच गंततो नदीचं

Scanned with CamScanner

विस्तीर्ण पात्र मात्र पाणी कमी आणि रखरखीत वाळवंट जास्त. तसेच चित्रपटात सावकाराच्या घरी पाळलेल्या म्हशीची आणि तिला नव्यान झालेल्या रेडकुचीही एक समांतर कथ पाहीला मिळते मात्र म्हशींची ही कथा कूळ कथेला पूरक असल्यामुळे तीही आई मुलाच्या भावनास्पर्शी नात्याबद्दल बरचं काही सांगून जो. तसेच म्हातारी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेवरीच्या फुलाला लटकून आकाशात उंच भरारी घेणारा चैत्या आणि त्याला खाली घेण्यासाठी जमिनीवरुन धावणारी त्याची आई हे स्वप्नदृष्टीही खूपच बोलकं ठरलं आहे.

कथेची भाष वऱ्हाडी आहे. त्यामुळे काही संवाद ऐकताना मजेशीर वाटतात. त्यामानानं चित्रपटात संवाद कमी आहेत. नाटयपूर्ण घटनाही पूर्णपणे नाहीत. परिनामी चित्रपट काही वेळा संथ वाटत मात्र अनेक दृष्य सुधाकर रेड्डी यंकट्टी यांचय कॅमेऱ्यानं खूपच बोलकी केली आहेत. त्यामुळे उष्कृष्ट छायाचित्रण ही जमेची बाजू ठरली आहे. संगीताबरोबरच पार्श्वसंगीतही खूप छान झालं आहे.

"आई मला खेळायला जायचय, जाऊ दे न वं..." हे चैत्यावर चित्रित केलेल गाणं मजा आणतं चैत्याची भूमिका केलेल्या श्रीनिवास पोकळे या बालकलाकारानं पदार्पनातचं खूप चांगल आश्वासक काम केल आहे. त्याचे निरागस भाव अनेक प्रसंगातून व्यक्त झाले आहेत देविका दफ्तरदारनेही नेहमी प्रमाणे आपल्या प्रभावी अभिनयांन चैत्याची आई खूप छान रंगवल आहे. तर चैत्याच्या वडिलांच्या भूमिकेत नागराज मंजुळे यांनीही सहज सुंदर अभिनय केला आहे. आजी झालेल्या सेवा चौहान आणि दिप्ती देवी याही छोटयाशा भूमिकेत चमकल्या आहेत. कथेचा नायक बालकलाकार असला तरी हा चित्रपट लहाण मुलाचा ठरलेला नाही. तो सर्वांनीच

Scanned with CamScanner

पाहण्यासारखा आहे कारण सर्वच दृष्टीनं ही "नाळ" रसिक प्रेक्षकांशी जोडली गेली आहे.

आईचं प्रेम कसं श्रेष्ठ आहे हे सांगत आश्वासक शेवटानं दिग्दर्शक चित्रपट संपतो "नाळ" ची कथा साधी सुंदर असून पटकथा लिहीतानाही सुधाकर रेड्डी यंकट्टी यांनी त्यातला साधेपणा जपला आहे. चित्रपटात सर्वसाधारण आई मुलाच्या नात्यामध्ये दाखवला जाणारा मेलोड्रामा यात आजिबात नसून आहे ती परिस्थिती समजून घेवून वागणारी खरी माणसं आपल्याला यात भेटतात आई तुला रडता येतं काय, सांगनं वं? अस सतत विचारणाऱ्या चैत्याला " का रं मला रडवायला लागलास ? असा प्रतिप्रश्न करुन गप्प बसवणरी आई त्यामुळे खरी वाटते चैत्याच्या सावकार वडीलांच्या ध्घरात श्रीमंती असली तरी लोडाशेडींगमुळे बराच वेळ वीज गायब असण्याचं ग्रामीण वास्तव सुचकपण `दाखवतो तसंच ग्रामीण महाराष्ट्राची समस्या प्रचंड त्रासदायक असून ती एखादयाच्या जीवावर कशी बेतू शकते हे दिग्दर्शकान प्रभावीपणे दाखवताना प्रेक्षकांचे डोळेही ओले केले आहेत. सुधाकर रेड्डी यंकट्टी यांच्या या स्टाईलमुळे "नाळ" अधिकाधिक वास्तव बनतो आणि थेट मनाला जाऊन भिडतो.

अव्दैत नेमळेकरचं पार्श्वसंगीत चित्रपटातील प्रत्येक प्रसंग प्रवाही व उठावदार होण्यास हातभार लावला तसंच सुधाकर रेड्डी यंकट्टीच कॅमेरावर्कही सुंदर आहे नदी नदीच्या शेजारील गाव तिथलं रखरखील जगणं त्यांनी कॅमेरातून अप्रतिम टिपल आहे चैत्यावर प्रेम करणारी तो रात्रभर गायब झाल्यावर बबदलानं अरवरथ झालेली आई

Scanned with CamScanner

देविका दप्तरदार यांनी उत्तमरित्या साकारलेली आहे. मंजुळेकरांनी साकरलेले चैत्याचे वडीलही मनाला भावतात. सेवा चव्हाण यांची आजी, ओमभूतकरनं साकारलेला मामा आणि दिप्ती देवीनं साकारलेली सिक्रेट भूमिकाही छान आहे. परंतू संपूर्ण चित्रपटाची मदार असलेला व श्रीनिवासनं उभा केलेला चैत्या सर्व विशेषणा पलिकडे जाऊन उष्कृष्ट ठरतो. , त्याची सवाद फेक, बोलके डोळे व एकूण देहबोली पाहता त्यांन चैत्याची भूमिका जगली आहे असं वाटतं त्यासाठी इतका उप्रतिम अभिनय करुन घेतल्याबद्दल दिग्दर्शक सुधाकर नाही सॅल्युट!

फुल टु टाइमपासचा आग्रह न धरणाऱ्यांनी ही नाळ पाहयला की प्रेक्षकांशी असलेली नाळ तुटणार नाही यांची खबरदारी निर्माता लेखक दिग्दर्शकांनी घेतली आहे.

Scanned with CamScanner

# चित्रपट का पाहावासा वाटला ?

नाळ हा चित्रपट २०१८ मध्ये प्रदर्शित झालेला असून विविध कलाकारांनी या चित्रपटामध्ये अत्यंत विलक्षणीय काम केले आहे. या चित्रपटामध्ये आई आणि मुलाची भवनास्पर्शी कथ रेखाटली आहे.

आजच्या काळामध्ये मुलं ही आई वडिलांपासून लांब जाण्याचे एकमेव कारण म्हणजे विकीपिडीया यामुळे आईच्या आणि मुलांचा संवाद कमी होत चाललेला आहे. कथेची भाष वऱ्हाडी असल्याने ऐकतानाही मजेशीर वाटते. या चित्रपटामध्ये विविध म्हणजे निर्माता, दिग्दर्शक, संगीत, वितरक, कथा, पटकथा या सर्वांनी आपापली कामे व्यवस्थित पार पाडली आहेत. सगळयात महत्वाचे म्हाजे हा चित्रपट प्रेक्षकांना आर्कर्षित करतो आईच प्रेम किती आणि कसं श्रेष्ठ असतं तसेच आपल्या मुलांला इजा झाल्यावरती आईचा जीव किती कासावीस होतो. या चित्रपटातून समजते

हा चित्रपट पाहवासा वाटण्याचे ाकरण म्हणजे चित्रपटाचे बोलच नाळ आहे नाळ म्हणजे एक विशिष्टपणे ठेवणारी बोलावरुनच निम्मे प्रेक्षक या चित्रपटाकडे आकिर्षित झाले आहेत. नाळ हा चित्रपट अप्रतिम आहेच पण त्यामध्ये ग्रामीण जीवनाचं शुटींगमुळे तो चित्रपट खेडयागावातील लोकांना विशिष्ट प्रकारे भवलेला आहे.

Scanned with CamScanner